# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे

फोन नं. ०२२-२९४५१००१

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट २८३ - २२ दिनांक १९/०९/२०२२

## रात्रीचे वेळी मोबाईल दुकान फोडून चोरी करणारे आरोपी मुद्देमालासह गजाआड-गुन्हे शाखा कक्ष-१ यांची कामगिरी

फिर्यादी नामे श्री. खेतेश हफ्ताजी चांदोरा, व्यवसाय-मोबाईल विक्रेता, रा. वैशाली टॉवर, गोडदेव गाव, भाईंदर पूर्व हे दि. १३/०९/२०२२ रोजी रात्री २२:३० त्यांचे शॉप नं २१, सुखसायगर बिल्डिंग, अभिनव स्कुल बसस्टॉप समोर, नवघर-फाटक रोड, भाईंदर पुर्व येथे न्यु इंप्रेशन नावाचे असलेले मोबाईल विक्रीचे दुकान बंद करुन घरी निघुन गेले व दिनांक १४/०९/२०२२ रोजी सकाळी ०५:३० वाजताचे सुमारास दुकानाजवळ आले त्यावेळी त्याचे बंद मोबाईलचे दुकानाचे अज्ञात चोरटयानी कशाचेतरी साहयाने दुकानास असलेले लोंखंडी शटर व ग्रिल शटर याचे कडीकोयंडे तोडुन त्यावाटे दुकानात प्रवेश करुन दुकानामध्ये विक्री करीता ठेवलेल्या मोबाईलपैकी सुमारे १३,००,०००/- रुपये किंमतीचे विविध कंपन्यांचे ७८ नवीन मोबाईल फोन घरफोडी करुन चोरी नेलेबाबत नवघर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.नंबर ६९१/२०२२ भादंविसं. कलम- ४५७, ३८०, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचा गुन्हे शाखा, कक्ष-१ काशिमीरा यांनी समांतर तपास करुन मिळून आलेल्या माहितीप्रमाणे आरोपी १) अजमल ऊर्फ बाबु शेख, वय-५२ वर्षे, रा. रुम नंबर ९, अले हबीब बिल्डींग, वाकणपाडा, नालासोपारा मुळ रा. गांव-भरोटीया, ता. डुमरीयागंज, जि. सिध्दार्थनगर, २) जाकीरअली मेहबुब शेख ऊर्फ कानिया, वय-३० वर्षे हे गुन्हा करतांना वापरलेली ऑटो रिक्षा नंबर एम.एच.०२/ईक्यु-९८०६ हिचेमधुन चोरी केलेला माल घेऊन मुंबई बाजुकडे जात असताना बाफाना फाटयाजवळ अडवून त्यांना ताब्यात घेण्यात आले. सदर आरोपीतांनी गुन्हयात चोरी करुन नेलेले १२,४७,६९५/- रुपये किंमतीचे विवो, ओपो व वनप्लस कंपनीचे एकूण ७८ नवीन मोबाईल व गुन्हयांत वापरलेली ऑटो रिक्षा जप्त करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी श्री. विजयकांत सागर, पोलीस उप-आयुक्त (मुख्यालय), अती. कार्य. पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हेशाखा कक्ष १ काशिमीरा येथील पो.नि.अविराज कुराडे स.पो.नि. कैलास टोकले, स.पो.नि.पुष्पराज सुर्वे, पोउपनिरी. हितेंद्र विचारे, सफौ. तांबे, सफौ.वाडीले, पोहवा/शिंदे, पोहवा/लांडगे, पोहवा/थापा, पोहवा/गायकवाड, पोहवा/संजय पाटील, पोना/प्रफुल्ल पाटील, पोशि/राजपूत, पोशि/समीर यादव, पोशि/सनी सुर्यवंशी यांनी अथक परिश्रम करुन गुन्हयातील आरोपीतांना अटक केली व चोरीस गेलेले मोबाईल हॅन्डसेट जप्त करुन सदरचा गुन्हा ०८ तासात उघड केला आहे.

---ooo---